IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# शिवराज्याभिषेक - एक ऐतिहासिक अध्ययन

**अमितकुमार गणेश शिंगणे**

संशोधक विद्यार्थी

एम. इ. एस. कॉलेज मेहकर,

जिल्हा बुलढाणा.

**सारांश -**

भारताच्या इतिहासात राज्याभिषेकाला पूर्वपार अतिशय गौरवशाली, महत्त्वाचे मानले जाते आणि मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचा विचार करता, भारतात सर्वत्र मुस्लिम राजवटी राज्य करीत असताना आणि परकीय सत्ता व्यापाराच्या निमित्ताने आपले साम्राज्य प्रस्थापित करू पाहत असताना एका मराठा, हिंदू राजाने दख्खनच्या छोट्याशा प्रदेशावर राज्य निर्माण करून, त्याचा साम्राज्य विस्तार करून, त्याला सार्वभौमत्व मिळवून देण्यासाठी राज्याभिषेक करणे ही अतिशय गौरवशाली, सन्मानाची आणि अभूतपूर्व घटना होय. ही अभूतपूर्व घटना शिवाजी महाराजांनी मध्ययुगीन भारतात 6 जून 1674 रोजी रायगडावर आपला राज्याभिषेक करवून सत्यात उतरवली. त्यामुळे मध्ययुगीन भारतातील एक अभूतपूर्व घटना म्हणून शिवराज्याभिषेकाला महत्वाचे स्थान आहे.

**प्रस्तावना -**

भारतात राजकीय शिखरावर विराजमान झालेल्या राजपुरुषांची न्यूनता नाही. राजेशाही असो किंवा लोकशाही भारतीय इतिहासाने अगणित राजपुरुषांना पाहिले आहे. त्यातील 90 टक्के राजे हे त्यांच्या पित्याच्या वारसा हक्काने गादीवर बसले; परंतु शिवाजी महाराज या सगळ्यांपेक्षा वेगळे होते. ते वारसा हक्काने सिंहासनारुढ बसले नव्हते तर ते स्वयंभू राज्याचे निर्माते होते. त्यामुळे समकालीन आणि उत्तरकालीन समाजात मोठ्या आदराने त्यांच्याकडे पाहिले आहे. प्रसिद्ध इतिहासकार यदुनाथ सरकार यांनी दिल्लीच्या राजवटीचा इतिहास लिहला आहे. त्यांनी औरंगजेबाचा इतिहास लिहितांना तत्कालीन काळात शिवाजी महाराजांच्या

भीमपराक्रमाची माहिती दिलेली आहे. त्यात ते लिहितात, **"हिंदु धर्म आहे'**, हे शिवाजी महाराज यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले. ज्या धर्मात शिवाजी महाराजांसारखे वीरपुरुष जन्म घेतात, तो धर्म कितीही संकट आली, तरी नष्ट होऊ शकत नाही; म्हणून हिंदु धर्म अक्षयवटाप्रमाणे पुनःपुन्हा वृद्धींगत होईल" असे नमूद केले आहे. शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक म्हणजे **'आम्ही जनतेचे संरक्षक आहोत'** हे सांगण्याचा प्रयत्न होता. शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाच्या निमित्ताने औरंगजेबाच्या राजधानीत 'हिंदु राज्या'चे आव्हान उभे केले. त्या काळी एखाद्या हिंदु राजाला स्वतःचा राज्याभिषेक करायचा म्हटला, तरी त्याला दिल्लीच्या बादशहाची अनुमती घ्यावी लागत असे. परंतु शिवाजी महाराजांना हिंदूचे सर्वधर्म समभाव असलेले राज्य निर्माण करायचे होते. त्यामुळे त्यांनी वेदमंत्रांच्या उच्चारांमध्ये विधीवत् आणि वंदनीय संतांच्या उपस्थितीत 6 जून 1674 या दिवशी स्वतःचा राज्याभिषेक करवून घेतला. त्या वेळी त्यांनी संस्कृत भाषेतील राज्यकारभारकोष व्यवहारामध्ये आणला. त्यांनी स्वराज्याचे स्वतंत्र चलन 'होन' असल्याचे घोषित केले आणि 'शिवमुद्रा' स्थापित करून स्वराज्याची राजधानी म्हणून किल्ले रायगडची घोषणा करून दख्खन येथील आपल्या साम्राज्याला **'हिंदवी स्वराज्य'** घोषित केले.

**उद्दिष्ट्ये** -

1. भारताच्या इतिहासात राज्याभिषेकाला असलेले महत्त्व समजून घेणे.
2. शिवराज्याभिषेकाची पार्श्वभूमी अभ्यासणे.
3. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात शिवराज्याभिषेकाला असलेले महत्त्व जाणून घेणे.
4. शिवराज्याभिषेक या अभूतपूर्व घटनेचा आढावा घेणे.
5. शिवराज्याभिषेकानंतर स्वराज्य आणि तेथील परिवर्तन समजून घेणे.

**विषयाचे महत्त्व** -

शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक होण्यापूर्वी दिल्लीत मोगलशाही, बिदरमध्ये बरीदशाही, गोवळकोंड्याची कुतूबशाही, विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही अशा पाच मुस्लीम सत्ता भारतावर राज्य करत होत्या. सोबतच व्यापाराच्या निमित्ताने परकीय सत्ता इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी हे देखील भारतावर राज्य करू पाहत होते. भारतातील मुस्लिम राजवटी आणि परकीय सत्तेच्या जुलमाला आणि अन्यायाला कंटाळलेल्या जनतेला स्वाभिमानाने जीवन जगता यावे यासाठी स्वतंत्र लढा उभारून शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे निर्मिती केली. अशा या स्वतंत्र राज्याचा अधिपती म्हणून राज मान्यतेसाठी राज्याभिषेक समारंभ घडवून आणणे अतिशय महत्त्वाची बाब होती. राज्याभिषेक व्हावा ही जनतेची म्हणजे श्री ची इच्छा आहे आणि ती राज्याभिषेकामुळे पूर्ण होत होती. राज्याभिषेकानंतर मराठा साम्राज्याला सार्वभौमत्व प्राप्त होऊन शिवाजी राजे हे छत्रपती झाले. त्यामुळे शिवराज्याभिषेकाला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**शिवराज्याभिषेकाची आवश्यकता** -

मध्ययुगीन भारतामध्ये दिल्लीपासून तर संपूर्ण भारतामध्ये मुस्लिम राजवट असून व्यापारासाठी परकीय सत्ता देखील भारतात स्थिरावल्या होत्या. या पार्श्वभूमीवर भारतातील हिंदूंवर आणि इतर धर्मावर अनेक प्रकारचे अन्याय होऊन त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आली होती. भारतातील मुस्लिम राज्यकर्ते भारतीय हिंदू जनतेवर अन्याय करून त्यांना मुस्लिम होण्यास प्रेरित करीत होते तर परकीय सत्ता व्यापार आणि ख्रिश्चन धर्माच्या प्रसार - प्रचार या दृष्टीने बळजबरीने हिंदूंवर धर्मांतर करण्यास दबाव आणीत तर कधी प्रलोभने दाखवत होती. त्यामुळे धर्मांतराचे मोठी संकट भारतावर ओढवले होते. जातीयवाद प्रचंड प्रमाणात उफाळला होता. अशा पार्श्वभूमीवर दख्खनमध्ये शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून तिथे सर्व जाती धर्मांना समानतेची वागणूक देत **सर्वधर्म समभाव** या तत्त्वाचे पालन करून मराठा साम्राज्य स्थापन केले. या साम्राज्याला सार्वभौमत्व प्राप्त होण्यासाठी राज्याभिषेक आवश्यक होता. तत्कालीन काळात राज्याभिषेकाला महत्त्वाचे स्थान असून राज्याभिषेक पूर्ण झाल्याखेरीज त्यांना राजाचा दर्जा न देता बंडखोर म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. त्यामुळे शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करून घेतला आणि शिवाजी महाराज हे मराठा साम्राज्याचे पहिले छत्रपती म्हणून विराजमान झाले. त्यांनतर भोसले घराण्याची सत्ता महाराष्ट्रावर प्रस्तावित झाली. यावरून शिवराज्याभिषेकाची मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये आवश्यकता लक्षात येते.

**शिवराज्याभिषेक** -

मध्ययुगीन भारतातील एक अभूतपूर्व घटना म्हणून मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी शहाजीराजे भोसले यांच्या राज्याभिषेकाकडे पाहिले जाते. शिवराज्याभिषेकावेळी अनेक अडचणी समोर आल्या त्यात प्रथमतः शिवाजी महाराजांचे कुळ क्षत्रिय आहे की नाही यावर प्रश्नचिन्ह उपस्थित राहिले. शिवाजी महाराजांच्या कुळासंबंधी संभ्रम उत्पन्न झाल्याने भोसले कुळाचा उदयपूरातील क्षत्रिय घराण्याशी संबंध होता. हे सिद्ध करण्यामध्ये बाळाची अवजी आणि त्यांचे काही इतर सरदाराने पुढाकार घेवून खूपच चढाओढी नंतर भोसले कुळ हे प्रभू रामचंद्रांच्या सूर्य वंशातील शुद्ध क्षत्रिय कुळ आहे, हे सिद्ध झालं. या भक्कम पुराव्याची शहानिशा केल्यानंतर मूळचे महाराष्ट्राचे असलेले परंतु सोळाव्या शतकापासून वाराणसीमध्ये वास्तव्य करणाऱ्या मराठी घराण्यातील ब्राह्मणापैकी एक घराणे पं. गागाभट्टचे होते. पं. गागाभट्ट यांनी महाराष्ट्रात येऊन राज्याभिषेकाचे प्रमुख पुरोहित म्हणून जबाबदारी घेतली. त्याने इतर ब्राह्मणांच्या सल्ल्याने आणि पवित्र धर्मग्रंथांच्या आधाराने राज्याभिषेकाचा विधी ठरला. हा विधी त्या काळातील कोणत्याही विधीपेक्षा वेगळा होता. या राज्याभिषेक सोहळ्याला फारसा कोठे विरोध आढळत नाही. याला कारण शिवाजी महाराज आणि गागाभट्टाने सादर केलेले शास्त्राधार असावेत. त्या नंतर ज्येष्ठ शुद्ध 13 शनिवार 6 जून 1674 रोजी शिवाजी महाराजांचा रायगडावर राज्यभिषेक झाला.

राज्याभिषेक सोहळा कित्येक आठवडे चालला; परंतु त्यातील कायदेशीर बाबी आणि राजनिष्ठा यांच्याशी संबधित विधीं महत्वाच्या आहे. सोहळ्याच्या पहिल्या भागात कुलदैवतांची पूजा आणि क्षत्रिय असूनही मराठ्यांच्या रितीभाती पाळल्याप्रित्यर्थ शिवाजी महाराजांकडून प्रायश्चित घेण्यात आले. दुसऱ्या भागात त्यांचा आणि युवराजांचा मौजीबंधनाचा विधी करण्यात आला. त्यानंतर क्षत्रिय परंपरेनुसार शिवाजी महाराजांचा त्यांच्या पत्नींबरोबर पुनर्विवाह करण्यात आले. या विधीमुळे शिवाजी महाराजांचे क्षत्रियत्व सिद्ध झाले आणि ते धर्मशास्त्रानुसार राजा बनण्यास पात्र झाले.

प्रत्यक्ष राज्याभिषेक विधी एकूण नऊ दिवस, नऊ रात्री चालला. परंतु मुख राज्याभिषेक हा 5 जून सायंकाळी सुरू होऊन 6 जून च्या सकाळी संपला. राज्याभिषेकासाठी एक मोठे आणि एक छोटे अशी दोन सिंहासने बनवली होती. विधीची सुरुवात उपवासांनी झाली. रात्री यज्ञकुंडात आहुती अर्पण करण्यात आल्या आणि नंतर शिवाजी महाराज छोट्या सिंहासनावर आसनस्थ झाले. त्याचबरोबर त्यांनी या सिंहासनावर बसून दरबार भरवून **शिवशक** सुरू झाल्याची आणि **शिवशाही** अवतरल्याची घोषणा केली. यानंतर शिवाजी महाराजांना सुवासिक तेल, पाणी आणि ऊन पाणी अशा शुद्धोदकांनी स्नान घालण्यात आले. त्याच्या अंगाला पवित्र स्थळांवरून आणलेल्या मातीचे लेपन करण्यात आले. त्यानंतर पंचामृताने (मध, दूध, दही, तूप आणि साखर) स्नान घातले. त्यानंतर पुन्हा पाण्याने स्नान करून चंदनाचा लेप लावण्यात आला. या सर्व विधींच्या उपरोक्त शिवाजी महाराजांना पृथ्वीवरील इंद्राचा प्रतिनिधी म्हणून घोषित करण्यात आले.

यानंतर कित्येक ब्राह्मणांनी विविध भागांतून आणलेल्या पवित्र द्रवांनी शिवाजी महाराजांचा अभिषेक करून त्यांना **‘अभिषिक्त राजा’** म्हणून मान्यता दिली. त्यानंतर “शिवाजी महाराजांच्या कपाळावर कुंकुमतिलक करवून सिंहासनावर आरूढ झाले. शिवाजी महाराजांच्या आसनाशेजारी पट्टराणी सोयराबाई आणि युवराज संभाजी राजे हे दुसऱ्या आसनावर बसले. अष्टप्रधान मंडळाचे आठही सभासद आठ दिशांनी उभे होते. पूर्वेला पंतप्रधान मोरोपंत तुपाने भरलेला सोन्याचा कलश घेवून, आग्नेय दिशेला अण्णाजी पंत छत्र धरून, दक्षिणेला हंबीरराव मोहित दूधाने भरलेला रौप्य कलश घेवून, पश्चिमेला रामचंद्रपंत अमात्य दह्याने भरलेला तांब्याचा कलेश घेवून, वायव्येला दत्ताजीपंत मोर्चेल घेऊन उभे होते. या सर्वांच्या साक्षीने मंत्र घोषात पट्टराणी व युवराज यांच्यावर अभिषेक केला. वाद्यांच्या मोठ्या गजरात सोळा ब्राह्मण सुवासिनींनी शिवाजी महाराजांना ओवाळले. दागिने, अलंकार, वस्त्र परिधान करुन डोळ्यावर मंदिल बांधला. नंतर शस्त्रास्त्रांची व रथाची पूजा केली. वडीलधारी मंडळींना वंदन करून राजसभेत सिंहासनावर रुढ झाले. शिवसिंहासनाच्या आठ दिशांना रत्नजडित स्तंभ असून हे सिंहासन 32 मण सोन्याचे होते. त्याचे छत्र जडजवाहीरांचे व मोतींच्या झालरीचे होते. सिंहासनाच्या दोन्ही बाजूला सुवर्णांकित भाल्याच्या टोकावर अनेक अधिकार दर्शक व राजसत्तेची चिन्हे होती. उजव्या हाताला दोन मोठ्या दातांच्या मत्स्यांची सुवर्णाची शिरे होती. डाव्या हाताला सोन्याच्या तराजूची पारडी न्यायचिन्ह म्हणून चमकत होती. सभागृहाच्या प्रवेशव्दारी दोन शुभलक्ष्मी हत्ती सुवर्णा लंकारासह उभे होते.” अशी नोंद राज्यरोहण प्रसंगी उपस्थित असलेल्या ऑक्सिंडन यांनी केलेली आहे.

शिवाजी महाराजांचे सुवर्ण सिंहासन असून त्यावर वाघ-सिंहांची कातडी अंथरली होती. येथे बसून त्यांनी आमंत्रित मंडळीकडून, वतनदार, सरदारांकडून भेटवस्तू बाण, धनुष्ये, घोडे आणि हत्तींचा स्वीकार केला. यानंतर खास दरबार भरवून सरते शेवटी सर्व रयतेसाठी खुला दरबार भरवण्यात आला, ज्यात शिवाजी महाराज यांना राजा म्हणून मान्यता देण्यात आली आणि शिवशाहीची उद्घोषणा करण्यात आली. खुल्या दरबारात उपस्थित असलेल्या ब्राह्मणांना, इतरांना मुक्त हस्ताने भरघोस दक्षिणा देण्यात आल्या.

**शिवराज्याभिषेकाचे महत्व** -

मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर पारतंत्र्याचे काळेकुट्ट ढग पसरलेले असताना स्वतंत्र राष्ट्राचे अस्तित्व प्रस्थापित करून सबंध देशाला स्वातंत्र्याची नवी ऊर्मी आणि चैतन्यशक्ती प्रधान करण्याचे काम निश्चितच शिवाजी महाराजांनी केले. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकामुळे सबंध देशामध्ये '**मुद्रा भद्राय राजते**' म्हणजे जनतेच्या कल्याणाचे नवे पर्व सुरू झाले. विजयनगरच्या पतनानंतर संपूर्ण भारतात एकही स्वतंत्र हिंदू राज्य नव्हते की जेथे हिंदू स्वाभिमानाने राहतील परंतु शिवराज्याभिषेकानंतर ही कमतरता भरून निघाली.
भारतात बलाढ्य मोगली सत्ता अस्तित्वात असताना त्यांचा प्रतिकार करण्यासाठी, टक्कर देण्यासाठी एक स्वतंत्र हिंदू राज्य स्थापन झाले. ज्यामुळे मुस्लिम राज्यकर्त्यांच्या मर्जीवर चालणाऱ्या भारतीय राजकारणाला तळा जाऊन हिंदूंना मिळणारी मुस्लिम राज्यकर्त्यांच्या राजवटीतील दुय्यम वागणूक राज्याभिषेकानंतर कमी झाली. शिवराज्याभिषेकामुळे स्वराज्याला कायदेशीर वैधानिकता मिळाली. सर्व भारतीय शासकाने शिवाजी महाराजांचे स्वराज्य सार्वभौम आहे हे मानले. स्वराज्यात अनेक वतनदार हे शिवाजी महाराजांच्या आधीपासून वतनदार होते ते त्यांना स्वराज्याचे राजे न मनात आपल्याप्रमाणे वतनदार अथवा बंडखोर मानून त्यांचे आदेश डावलत होते. परंतु राज्याभिषेकानंतर आजूबाजूच्या वतनदारांनी कायदेशीररित्या शिवाजी महाराजांचे स्वराज्य मान्य केले. शिवाजी महाराजांना त्यांच्या राज्यालगत असलेल्या इतर सुलतान आणि राजप्रमुखांच्या बरोबरीचे स्थान राज्याभिषेकामुळे मिळाले. महाराष्ट्रातील कित्येक प्रबळ घराण्यांकडून राजनिष्ठेचा स्वीकार केला. महाराष्ट्राबाहेरील ऑक्सिंडन हा इंग्रज अधिकारी या समारंभाला हजर होता. त्यांनी असा प्रकारे संपत्तीचे आणि शक्तीचे दैदीप्यमान प्रदर्शन असलेला धार्मिक विधी पहिल्यांदा पहिला या बाबतीत तो अनभिज्ञच होता. इंग्रज अधिकऱ्याची शिवराज्याभिषेकाला उपस्थिती म्हणजे परकीय सत्तेचे शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला दिलेली मान्यता दिसून येते.

**शिवराज्याभिषेकाविषयीचे अभ्यासकाची मते** -

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापूर्वी लंडनमधील गॅजेट या साप्ताहिकाच्या पहिल्या पानावर प्रकाशित झालेल्या एका वृत्तांतामध्ये शीर्षस्थानी मथळा दिला आहे. त्यामध्ये इस्लामी प्रभावाच्या भारतामध्ये

अभ्युदयास आलेला हिंदू सम्राट (हिंदू राजा) असे शिवाजी महाराजाचे वर्णन ब्रिटिश साप्ताहिकाने केले आहे. यदुनाथ सरकार '**शिवाजी अँड हिज टाईम्स**' या ग्रंथामध्ये लिहितात, "शिवाजी महाराजांनी एक प्रकारे कल्याणकारी राज्याची स्थापना केली होती. कारण त्यांनी जनतेच्या कल्याणासाठी घेतलेले निर्णय आणि आखलेल्या योजना इतक्या दूरदृष्टीच्या होत्या की, त्यातून त्यांच्यातील दूरदर्शीपणा आणि सामान्य जनतेविषयी असलेला आदरभाव दिसून येतो."

न्या. महादेव गोविंद रानडे 'मराठी सत्तेचा उदय आणि उत्कर्ष' या ग्रंथामध्ये म्हणतात, "शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली झालेला मराठी सत्तेचा उदय म्हणजे भारतीय राष्ट्रीय इतिहासातील राष्ट्रवादाच्या उदयाचा परीपाक होय. परकीय सत्ता आणि त्यांच्या आक्रमणामागील दुष्ट हेतूंचा विचार करून भारताचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यामध्ये शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाने एक नवा वर्गबिंदू सिद्ध केला. त्यामुळे भारतीय इतिहासाला कलाटणी देणारा हा एक श्रेष्ठ क्षण म्हणावा लागेल." यावरून असे सिद्ध होते की, शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकातून प्रकट होणारा भारताच्या स्वातंत्र्याचा मूल्यभाव हा अत्यंत महत्त्वाचा आहे. शिवराज्याभिषेकाने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या कल्पनांची हमी दिली.

शिवाजी महाराजांनी राज्यकारभाराचा गाडा चालवण्यासाठी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. अष्टप्रधान हे वंशपरंपरेने नव्हे तर गुणवत्तेने ठरतील असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे डॉ. बाळकृष्ण म्हणतात, "अष्टप्रधानांना दिलेले वेतन आणि त्यांची कार्यविभागणी पाहता भारताच्या लोकशाहीची खरी बैठक शिवाजी महाराजांच्या काळापासून सुरू होते असे म्हणता येईल. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाने भारतीय राष्ट्रवादाचा पाया घातला गेला. रयतेचे कल्याण करणे हे श्रेष्ठ सूत्र आहे हे त्यांनी सिद्ध केले."

**निष्कर्ष** -

1. भोसले कुळातील शिवाजी शहाजी राजे भोसले यांनी विजापूरच्या आदिलशाहीविरुद्ध आणि मोगल साम्राज्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केल्याने ते मराठा साम्राज्याचे संस्थापक आणि प्रथम छत्रपती म्हणून ओळखले जातात.
2. मराठा साम्राज्याला सर्वमान्यता मिळावी या हेतूने शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करवून घेतला.
3. तत्कालीन जगातील राज्यकर्त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा तौलनिक आढावा घेतला असता असे दिसते की, "संपूर्ण मध्ययुगामध्ये शिवाजी महाराजांचे राज्य हे त्या काळातील युरोपीय आणि सर्व आशियाई राज्यांपेक्षा श्रेष्ठ होते."
4. तत्कालीन मध्ययुगीन काळात स्वराज्याचे अस्तित्व प्रस्थापित करून सबंध देशाला स्वातंत्र्याची नवी ऊर्मी आणि चैतन्यशक्ती प्रधान करण्याचे श्रेय निश्चितच शिवाजी महाराजांकडे जाते.
5. स्वराज्यातील शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाने भारतीय राष्ट्रवादाचा पाया घातला गेला.

**संदर्भ ग्रंथ सूची** -


1. कुलकर्णी अ.रा - शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 1993.
2. खोले, विलास (संपा.) - आज्ञापत्र, लोकवाङमय प्रकाशन, पुणे, 2007.
3. गाठाळ, एस.एस. - मराठ्यांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2019.
4. गॉर्डन, डॉ. स्टुअर्ट (अनु. - कुलकर्णी र. अ.) - द मराठाज (1600-1818), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2016.
5. रडे, प्रा. का.रा.; चौधरी, प्रा. श्रेया - मराठी सत्तेचा उदय (इ. स. 1630-1707), प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2013.
6. राऊत, गणेश - छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकाळ डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती 2013.
7. वाकसकर, विनायक सदाशिव - श्री. शिवप्रभूचे चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे 1973.
8. सामंत, बाळ - शिवकल्याण राजा, निर्मिती प्रकाशन, मुंबई, 1998.
9. सोवनी, अविनाश - स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधान, पूर्वा प्रकाशन, पुणे, 1998.


***